जगभर

श्री लंका, रशिया, बेलारूस आणि अमेरिका

चन्द्रशेखर पुरन्दरे

श्रीलंका

श्रीलंकेत ऑगस्टमध्ये सार्वत्रिक निवडणुका झाल्या. निवडणुकीने राजपक्ष घराण्याच्या सत्तेवर पुन्हा शिक्कामोर्तब केले.

त्यांच्या पक्षाच्या आघाडीला अपेक्षेपेक्षा जास्त बहुमत मिळाले. दोन-तृतीयांश बहुमत असल्यास घटना दुरुस्ती करता येते. ती शक्यता आहे. घटना बदलून एक-तंत्रीय राजवटीकडे वाटचाल होणे संभवते. त्याआधी मागच्या वर्षीच्या अध्यक्षीय निवडणुकीत गोटाबाया राजपक्ष विजयी झाले. त्यांनी मार्चमध्ये संसद बरखास्त केली. एप्रिलला होणाऱ्या निवडणुका करोनामुळे पुढे ढकलण्यात आल्या व ऑगस्टमध्ये झाल्या.

राजपक्ष घराणे श्री लंकेत बरीच वर्षे सत्तेवर आहे. महिंदा राजपक्ष २००५ ते २०१५पर्यंत श्रीलंकेचा अध्यक्ष होते. त्यांच्या कारकीर्दीत तमिळ एलम या श्रीलंकेपासून विभक्त होऊ पाहणाऱ्या पूर्व आणि उत्तर श्री लंकेतील तमिळ चळवळीचा जवळ जवळ संपूर्ण नायनाट झाला. त्यात प्रचंड नरसंहार झाला. संयुक्त राष्ट्रसंघ, मीडिया यांनी हे गुन्हे होते असेही सिद्ध केले पण या कारवाईला श्री लंकेतील बहुसंख्य बौद्ध सिंहली जनतेचा पाठिंबा होता. ही मोहीम महिंदचा भाऊ गोटाबाया राजपक्ष यांनी राबवली. ते तेव्हा संरक्षणमंत्री होते. [आता अध्यक्ष] तिसरा भाऊ बासिल आर्थिक विकास मंत्री होता, त्याच्यावर भ्रष्टाचाराचे बरेच आरोप आहेत.चौथा भाऊ लोकसभापती होता तर अनेक भाचे, पुतणे सरकारी पदाधिकारी होते. या राजवटीच्या भ्रष्टाचारामुळे २०१५ च्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. आधीचा विरोधी पक्ष 'सार्वजनिक जीवन स्वच्छ करू' अशा वचनावर सत्तेवर आला.

राजपक्षच्या काळात श्री लंका चीनच्या जवळ गेली. चीनच्या मदतीने अनेक मोठे प्रकल्प सुरु झाले. त्यातील एक बंदर, एक आंतरराष्ट्रीय विमानतळ असे प्रकल्प देशाला उपयोगी नव्हते आणि पांढरे हत्ती झाले. [*आंदोलन, सप्टेंबर - ऑक्टोबर २०१८, डिसेंबर २०१८*]

परंतु मागच्या वर्षीच्या ईस्टर या ख्रिश्चनांच्या सणाच्या दिवशी २१ एप्रिलला मुस्लिम आतंकवाद्यांनी चर्चेस व परदेशी पर्यटक राहणाऱ्या हॉटेल्सवर साखळी बॉम्बहल्ले केले. त्यात साडेतीनशेहून अधिक लोक मृत्युमुखी पडले. हे हल्ले श्री लंकन ख्रिश्चन व पर्यटकांवर होते. महिनाभर आधी मार्चमध्ये खाईस्टचर्च या न्यूझीलंड मधील गावात एका 'गोरे श्रेष्ठ' या अति-उजव्या आदर्शवादी माथेफिरूने मशिदींवर हल्ले करून ६० मुस्लिमांना ठार केले होते. त्या हल्ल्याचे हे प्रत्युत्तर होते. ईस्टरच्या हल्ल्यानंतर देशाचा पर्यटन व्यवसाय एकदम मंदावला, किंबहुना बंदच पडला. सरकारचे मोठे उत्पन्न थांबले आणि मोठ्या लोकसंख्येला झळ पोचली.

मग जनमत बदलले. तमिळ अलगतेच्या युद्धाची निर्णायक समाप्ती करणाऱ्या राजपक्ष घराण्याकडे लोकांचा कल परत गेला. अराजकापासून, आतंकवाद्यांपासून तेच देशाला सावरू शकतील, परत आर्थिक उभारणी करू शकतील या आशेने मतदान झाले. तेही कोरोनाच्या काळात ७० टक्केहून जास्त आणि आता ते घराणे सत्तेवर आले. विशेष म्हणजे राजपक्ष घराण्याचा एक प्रमुख विरोधक सजीत प्रेमदास हा आधीच्या अध्यक्षाचा मुलगा. म्हणजे हे घराणे किंवा ते एवढाच पर्याय.

उथळ लाटांवर आधारित निवडणुका; सखोल, टिकाऊ विकासापेक्षा, सर्वसमावेशक सामाजिक न्यायापेक्षा वांशिक अस्मितांना प्राधान्य या निर्वाचित लोकशाहीच्या त्रुटी आहेत. त्यामुळे घराणेशाहीला लोकशाही मान्यता मिळते. अल्पदृष्टी हा लोकशाहीचा अंतर्भूत गुणधर्म असावा. लोकशाहीच्या 'सुज्ञ' मतदाराविषयी यामुळे संशय निर्माण होतो.

रशिया

श्रीलंकेसारख्या ठिकाणी घराणेशाहीकडे लोक आकृष्ट झालेले दिसतात. पण त्याचवेळी एक-व्यक्तिकेंद्रित राजवटींविरुद्ध काही देशांत लोक मोठ्या धैर्याने रस्त्यावर येऊ लागले आहेत. हा स्वागतार्ह संकेत आहे. तो प्रवाह झाल्यास अशा राजवटींवर वचक बसावा. रशिया आणि त्याच्या शेजारच्या बेलारूस या

देशांत जुलै-ऑगस्टमध्ये हे निषेध आढळून येत आहेत.

रशियाच्या अतिपूर्व प्रदेशात खळबळ माजली आहे. हा प्रदेश चीनला लागून आहे. तेथील मोठे शहर खोबरोवस्क. ते रशियाची राजधानी मॉस्कोपासून चार हजार मैलावर आहे तर चीनच्या सीमेपासून थोडक्या मैलांवर. त्या प्रांताच्या गव्हर्नरला ९ जुलैला मॉस्कोहून पाठवलेल्या पोलिसांनी अटक केली, मॉस्कोला नेले आणि दोन महिने पोलीस कस्टडीत ठेवले आहे. त्याच्यावरचे आरोप गंभीर आहेत - १५ वर्षांपूर्वी त्याने दोन खून करवले, नंतरही एक. या अटकेविरुद्ध केंद्रसरकारला अनपेक्षित तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. 'आमच्या' गव्हर्नरला सोडा, त्याची चौकशी करायचीच तर आमच्या प्रांतात करा, मॉस्कोत नको - तेथे त्याला न्याय मिळणार नाही. निषेधाचा रोख व्यक्तिश: रशियाचा सर्वेसर्वा व्लादिमिर पुतीनवर आहे. त्यामागे अनेक वर्षांची प्रादेशिक अन्यायाची भावना आहे. मॉस्को आपल्या प्रदेशातील नैसर्गिक साधन संपत्तीची लूट करते, इत्यादी. त्याचबरोबर पुतीनने स्वत:ला निवडून आणून २०३६ पर्यंत सत्तेवर राहण्याचा इरादा नुकताच स्पष्ट केला. [त्याचा उल्लेख मागच्या अंकात आहे.] त्या लादलेल्या नेतृत्वाविरुद्ध, कोरोनाची अक्षम हाताळणी याविरुद्धही हा असंतोष आहे. अलीकडचे कारण म्हणजे मागच्या वर्षीच्या निवडणुकीत पुतीनच्या उमेदवाराला हरवून आताचा गव्हर्नर निवडून आला, पुतीनला याचा आकस असावा. या विरोधाला नेतृत्व नाही, मागण्याही संदिग्ध आहेत. ही सार्वजनिक निषेधाची लक्षणेही जगात इतरत्र दिसतात. [फ्रान्समधील yellow vests निषेध]

विशेष म्हणजे हा प्रांत केंद्र सरकारविरुद्ध इतक्या उघडरीत्या आजवर आलेला नाही. सोव्हिएत रशियाच्या विभाजनानंतर अनेक प्रांत स्वतंत्र देश झाले [कझाकस्तान, अझरबैजान,जॉर्जिया वगैरे]. तसा हा प्रदेश स्वायत्त देश झाला नाही. त्यामुळे केंद्राला हा धक्का होता. दुसरा पैलू म्हणजे दमनशाहीने असे विरोध दडपणे हे इतर एकाधिकारी वृत्तीच्या नेत्यांसारखेच पुतीनचेही धोरण राहिलेले आहे. पण या स्थानिक विरोधाला सामोरे जायला लेख लिहीपर्यंत तरी मॉस्कोहून कुमक पाठवली गेली नाही. स्थानिक पोलिसांवरच निषेध नियंत्रण सोडले गेले. त्यातही स्थानिक पोलीस या निषेधाला सहानुभूत असल्याचे आढळले आहे. पुतीनच्या चिरेबंदी सत्तेला तडे जात आहेत की काय असे वाटावे.

[पुतीनचा सततचा विरोधक नेवलनी यांच्यावर २० ऑगस्टला विषप्रयोग झाला. त्याची प्रकृती गंभीर आहे. फ्रांस आणि जर्मनीने या प्रकरणाची चौकशी करावी अशी मागणी केली आहे आणि नेवलनीवर उपचारांची तयारी दर्शवली आहे.]

बेलारूस

वर म्हटल्याप्रमाणे पूर्वीच्या सोविएत रशियाच्या विभाजनानंतर अनेक प्रांत स्वतंत्र देश झाले. त्यातील एक बेलारूस. तो आताच्या रशिया आणि पोलंडच्या मध्ये येतो. हा देश आपल्या प्रभावक्षेत्राखाली राहावा म्हणून रशिया त्याला स्वस्तात गॅस आणि तेल पुरवतो. गेली २६ वर्षे तेथे ल्युकाशेन्को याची एकाधिकारशाही आहे. विरोधकांना कैदेत टाकणे, पोलिसी अत्याचार अशा मार्गांनी विरोध दडपत ती आजवर टिकून राहिली आहे. दहा वर्षांपूर्वी दिखाऊ निवडणुकीत याच रीतीने ल्युकाशेन्को निवडून आला होता. ९ ऑगस्टच्या या निवडणुकीतही हाच प्रयोग त्याने केला पण तो महागात पडत आहे. प्रथमच त्याला समर्थ विरोधक भेटली. तिचे नाव स्वेतलाना त्सिखानुसकी. तिला निवडणुकीआधी मोठा प्रतिसाद मिळाला. मतदानात ल्युकाशेन्कोने बरीच अफरातफर केली आणि आपण ८० टक्के मते मिळवून जिंकलो असे जाहीर केले. सुरक्षेच्या काळजीने स्वेतलानाने बेलारूस सोडला व ती शेजारच्या लिथुआनिया नावाच्या देशात आश्रयाला गेली. तिने निवडणुकीचा निर्णय मान्य नसल्याचे जाहीर केले. दरम्यान तिचे समर्थक देशात विशेषत: मिन्स्क या राजधानीत निदर्शने करत राहिले आहेत. बऱ्याच जणांवर हिंसक पोलिसी कारवाई चालू आहे पण लोक त्याला जुमानत नाहीत असे दिसते. ल्युकाशेन्कोने हरल्याचे मान्य करावे अशी मागणी त्यांनी लावून धरली आहे.

नेहेमीप्रमाणे घरगुती दहशत कामी येत नाही असे लक्षात आल्यावर ल्युकोशेन्कोने रशियाकडे मदतीची [म्हणजे लष्कर पाठवण्याची] विनंती केली. हा प्रश्न जरा गुंतागुंतीचा आहे. पुतीनने काही काळापूर्वी बेलारूस आणि रशिया यांनी राजकीय दृष्ट्या एकत्र यावे असा प्रस्ताव मांडला होता. तो ल्युकाशेन्कोने फेटाळला कारण हे संघराज्य रशियाच्या, म्हणजे पुतीनच्या अमलाखाली आले असते. आता एक शक्यता अशी आहे की रशिया मदत करणार नाही, मग ल्युकाशेन्को दुबळा होईल व ते रशियाच्या पथ्यावर पडेल. दुसरा कोन म्हणजे युक्रेनचा क्रिमिया प्रांत बळकावल्यावरून पश्चिमेने रशियावर आधीच व्यापारी निर्बंध लादले आहेत. त्यामुळे रशियाच्या अर्थकारणावर विपरित परिणाम झाला

आहे. बेलारूसमध्ये हस्तक्षेप केल्यास पश्चिम हे निर्बंध आणखी वाढवेल. युरोपिअन युनियनने बेलारूसची निवडणूक अमान्य करून त्या देशावर संभाव्य निर्बंधांची धमकी दिली आहेच.

आजवर ल्युकाशेन्को रशियाकडून आपल्याला धोका आहे अशी बतावणी करून आपल्या दमनकारी राजवटीकडे युरोप दुर्लक्ष करेल अशी काळजी घेत असे. तर आपण युरोपच्या प्रभावाखाली जाऊ शकतो अशी बतावणी करून रशियाकडून फायदे मिळवत असे. ही सर्कस आता चालेल असे दिसत नाही.

अमेरिका

अमेरिकेतील दोन तीन महत्त्वाच्या घटनांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. एकतर नोव्हेंबरच्या अध्यक्षीय निवडणुकी-साठी जो बायडेनला डेमोक्रॅटिक पक्षाची उमेदवारी मिळाली. आतापर्यंतच्या सर्वेक्षणांवरून तो ट्रम्पच्या पुढे आहे. याची जाणीव झाल्याने ट्रम्प येनकेनप्रकारेण सत्तेवर राहण्याचे मार्ग शोधत आहे. करोनामुळे मोठ्या प्रमाणावर लोक पोस्टाने मतदान करतील. त्यात हेराफेरी होणार, परदेशी शक्ती [रशिया आणि चीन] ढवळाढवळ करणार, निकाल लागायला उशीर होणार, तर निवडणूक पुढे ढकला वगैरे आवया उठवायला ट्रम्पने सुरुवात केली आहे. भर म्हणून पोस्ट खात्याचे बजेट न वाढवण्याचा प्रयत्न आहे जेणेकरून कमी मनुष्यबळामुळे ते खाते मतपत्रिकांची वाहतूक वेळेत करू शकणार नाही. हरल्यास ट्रम्प सहजा-सहजी सत्ता सोडेल असे आता तरी दिसत नाही.

जॉर्ज फ्लॉइडच्या पोलिसी हत्येनंतर [आंदोलन, जुलै २०२०] उसळलेली अशांतता अमेरिकेत बऱ्याच शहरात पसरली. वर उल्लेख केलेल्या बेलारूससारखेच लोक पोलिसी दमनशाहीचा निषेध करत आहेत. त्यात बऱ्याच ठिकाणी निदर्शकांनी दुकाने फोडणे, जाळपोळी करणे असे प्रकार केले. अमेरिकेला या 'डाव्या' अराजकांकडून धोका आहे हा ट्रम्पचा पहिल्यापासून दावा आहे. त्याला समर्थन मिळाले. त्यावर 'इलाज' म्हणून केंद्रीय सुरक्षा दल अनेक शहरात [बहुधा बेकायदेशीर रीत्या] पाठवण्यात आले. त्याविरुद्ध आणखीच विरोध सुरु झाले. राष्ट्रप्रमुखाला अशोभनीय असे आगीत तेल ओतण्याचे ट्रम्पचे धोरण आहे.

www.purandarearts.com
www.art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk